**प्रेसनोट दि.२२/०३/२०१९**

**लष्कर पोलीस स्टेशन कडील चांगल्या कामगीरीची माहिती.**

दि.२०/०३/२०१९ रोजी होळी सन असल्याने लष्कर पोलीस स्टेशन पुणे हद्दीत सपोनि काटे,पो.ना.२१५१ लांडगे,पो.शि.७६६१ तांबोळी व पो.शि.७३४२ काळे तसेच सेंटर स्ट्रिट मार्शल पो.शि.१०४३५ सोयाम ,पो.शि.९८२५ शेख असे पायी पेट्रोलिंग करीत असताना आम्हांस एक बंद पाकीट दिसले ते आम्ही सेंटर स्ट्रिट पोलीस चौकीत आणले व ते फाडुन आत पाहिले असता,त्यामध्ये एच.डी.एफ.सी. बॅंकेचे क्रेडीट कार्ड,चेक बुक बॅंकेचे इतर कागजपत्रे पीन नूंरसह दिसल्याने आम्ही इसम अनिस मेहबुब शेख वय ३५ वर्षे धंदा व्यवसाय रा.दस्तुर मेहेर रोड,कॅम्प,पुणे यांचे असल्याचे नाव व पत्ता व मोबाईल नंबर असल्याने त्यांना सेंटर स्ट्रिट पोलीस चौकीस येथे फोन करून बोलावुन घेतले असता सदर व्यक्तीला एच.डी.एफ.सी. बॅंकेचे क्रेडीट कार्ड, चेक बुक हे त्यांचेच असल्याची खात्री केली व सदर इसमाने सांगितले की, जे क्रेडीट कार्ड आहे ते सुमारे १ लाख ७०,०००/- रू.पर्यंत लिमीटेड असलेले कार्ड आहे.सदर पाकीटात असलेले एच.डी.एफ.सी.बॅंकेचे क्रेडीट कार्ड,चेक बुक इसम अनिस मेहबुब शेख यांना त्यांचे ताब्यात वरील नमुद अधिकारी व कर्मचारी यांनी परत दिले.

